# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

टेलि. : २४०१०४३७
२४०२०७८१
२४०१४७०१
फॅक्स : २४०२ ४०६८
Visit us at : http://mpcb.mah.nic.in

कल्पतरू पॉईंट, २/३/४ था माळा,
सिने प्लॅनेटसमोर,
सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व),
मुंबई - ४०० ०२२.

## माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत गठीत करण्यात आलेल्या ॲपेलेट ऑथॉरिटीसमोर

<u>आस्थापना अपिल क्र.१ /२०१२</u>

सुनावणी दिनांक २७/६/२०१२

श्री जि.वी.राजपुत,
मु.कोबापुर, पो.कनकोर,
ता.गंगापुर, जिल्हा: औरंगाबाद ... अपिल करणार

विरुध्द

माहिती अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
कल्पतरु पॉईंट, सिनेप्लॅनेटसमोर,
सायन सर्कलजवळ, रोड नं.८, सायन,
मुंबई-४०० ०२२ ... प्रतिवादी

## आदेश

अपिल करणार यांनी दिनांक ३०/४/२०१२ रोजी खालील मुद्यांवर माहिती मागितलेली होती. मात्र, सदरहू माहिती विहित वेळेमध्ये उपलब्ध करुन न दिल्यामुळे, सदरहू अपिल दाखल करण्यात आलेले आढळून येते. सदरहू बाबत खालीलप्रमाणे अपिलाच्या सुनावणीदरम्यान चर्चा करण्यात आली.

१. **मप्रनि मंडळाच्या एप्रिल, २०१२ मध्ये झालेल्या बैठकीसाठी तयार करण्यात आलेला मसुदा, त्याबाबतची टिप्पणी व कागदपत्रे -** लेखा अधिकारी (आस्थापना) यांनी दिनांक

४/६/२०१२ रोजी अपिल करणार यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये उपस्थित केलेल्या मुद्दयांबाबत माहिती, जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन दिली. जन माहिती अधिकारी यांनी सदरहू माहिती, अपिल करणार यांनी दिनांक ११/६/२०१२ रोजी प्रत्यक्षात कार्यालयातून घेतलेली असल्याचे स्पष्ट केले. तसेच, सदरहू पत्रावर अपिल करणार यांनी स्पष्टपणे **काही प्रमाणात माहिती मिळाली आहे,** असा अभिप्राय देऊन माहिती घेतलेली आढळते.

अपिल करणार यांना कोणती माहिती अपूरी आहे, असे सुनावणीच्या दरम्यान विचारले असता, त्यांनी खालीलप्रमाणे स्पष्टीकरण दिले. त्यामध्ये अपिल करणार यांनी अ व ड मुद्दयांबाबत माहिती मिळाली असल्याचे मान्य केले. मात्र, मुद्दा क्र.१(ब व क) माहिती मिळाली नसल्याचे निदर्शनास आणून दिले.

आस्थापना शाखेतर्फे माहिती अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, सदरहू माहिती प्रभारी सहाय्यक सचिव श्री अ.अ.मोकाशी यांच्याकडून दिनांक ८/५/२०१०(८/५/२०१२) नुसार प्राप्त झालेली असून, त्यामध्ये मुद्दा क्र.१ (ब) बाबत असे स्पष्ट करण्यात आलेले आहे की, मंडळाच्या बैठकीला मंडळ सदस्यांची उपस्थिती आवश्यक आहे, मात्र अधिका-यांची उपस्थिती ही फक्त मदतीसाठी असते. त्यामुळे त्यांच्या स्वाक्षरीची कागदपत्री कोठेही नोंद घेण्यात येत नाही. सुनावणीच्या दरम्यान मप्रनि मंडळाच्या बैठकीची प्रत्यक्ष प्रक्रिया लक्षात घेऊन असेही स्पष्ट करण्यात आले की, स्वाक्षरीबरोबर, संबंधीत अधिका-यांच्या नावाचीदेखील कोठेही नोंद घेण्यात येत नाही. त्यामुळे, अशी माहिती मंडळाकडे उपलब्ध नाही.

मुद्दा क्र.१(क) बाबत एप्रिल २०१२ मधील मप्रनि मंडळाच्या बैठकीचे इतिवृत्त व झालेल्या निर्णयासंदर्भात सर्व कागदपत्रे मागितलेली होती. मात्र, अपिलाच्या सुनावणीच्या दरम्यान अपिलकर्ता यांनी केवळ इतिवृत्ताची प्रत उपलब्ध करुन द्यावी, अशी विनंती केली. त्यानुसार प्रभारी सहाय्यक सचिव यांना सदरहू इतिवृत्ताची प्रत ताबडतोब उपलब्ध करुन देण्याबाबत सूचना देण्याचे ठरले, मात्र, श्री मोकाशी रजेवर असल्यामुळे, सहाय्यक विधी अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयातून सदरहू प्रत उपलब्ध करुन देण्यास सांगण्यात आले व ती उपलब्ध करुन देण्यात आली.

२. **अपिल करणार यांनी मंडळातील तथाकथित बेकायदेशीर नियुक्त्या व पदोन्नत्या याबाबत केलेल्या तक्रारी व त्यावरील कार्यवाही** - अपिल करणार यांनी दिनांक ६/२/२०११, ८/६/२०११, २२/१०/२०११ आणि १३/१२/२०११ या पत्रांद्वारे मप्रनि मंडळाकडे विविध तक्रारी केलेल्या होत्या व त्याबाबत मप्रनि मंडळाने कोणती कार्यवाही केली, ही माहिती मागितलेली होती.

सदरहू बाबतीत दिनांक ४/६/२०१२ च्या पत्राद्वारे संबंधीत बाबत आस्थापना शाखेने टिप्पणीची प्रत उपलब्ध करुन दिलेली आढळते. अपिल करणार यांनी सदरहू टिप्पणीवर काय कार्यवाही झाली हे स्पष्ट होत नसल्यामुळे, माहिती अपूरी असल्याचे सांगितले. आस्थापना शाखेने त्याबाबत असे स्पष्ट केले की, मप्रनि मंडळाने त्यांच्या पत्रांवर काय कार्यवाही करावी, हे टिप्पणीद्वारे स्पष्ट केलेले आहे आणि सदरहू पत्रांबाबत उपलब्ध असणारी सर्व माहिती देण्यात आलेली आहे. मात्र, अद्याप त्यावर अंतिम निर्णय झालेला नाही.

३. **जबाबदार असणा-या अधिका-याचे नाव व हुद्दा व करण्यात आलेली कार्यवाही** - संबंधीत अर्जावर कार्यवाही चालू असून, त्यामध्ये अंतीम निर्णय झाल्यानंतर, जबाबदार अधिका-याचे नाव, हुद्दा व करण्यात आलेली कारवाई याबाबत तपशील उपलब्ध करुन देण्यात येईल.

४. **म.ना.से. नियमानुसार होणा-या कारवाईबाबतची तरतुद** :- म.ना.से.नियमामध्ये शिस्तभंग आणि प्रशासकीय कारवाईबाबत स्वयंस्पष्ट तरतुदी उपलब्ध असून, कारवाईचे स्वरुप ठरल्यानंतर किरकोळ अथवा मध्यम किंवा अतिशय गंभीर अशा शिस्तभंग अथवा प्रशासकीय अपूर्ततेबाबत कोणती तरतूद आहे, त्याप्रमाणे नियम स्पष्ट करण्यात येईल.

५. **प्रादेशिक अधिकारी, उप-प्रादेशिक अधिकारी आणि क्षेत्र अधिकारी यांची बिंदुनामावली उपलब्ध करुन देणेबाबत** - आस्थापना शाखेने यापूर्वीच प्रादेशिक अधिकारी, उप-प्रादेशिक अधिकारी या पदांची शासनाकडून उपलब्ध झालेली पदोन्नतीबाबतची बिंदुनामावली अपिल करणार यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. मात्र, प्रादेशिक अधिकारी आणि उप-प्रादेशिक अधिकारी यांची सन, २००० पासूनची सरळ सेवेची आणि क्षेत्र अधिकारी यांची पदोन्नती व सरळ सेवेची बिंदुनामावली अद्यापपावेतो शासनमान्यता नसल्यामुळे आणि शासनाकडे प्रलंबित असल्यामुळे, बिंदुनामावली उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही, असे आस्थापना शाखेतर्फे स्पष्ट करण्यात आले.

६व ७. **क्षेत्र अधिकारी यांच्या २००९ मधील पद भरतीबाबत** -आस्थापना शाखेने दिनांक ४/६/२०१२ रोजीच्या पत्राद्वारे असे स्पष्ट उत्तर दिलेले आहे की, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांची पदनिर्मितीसाठी दिनांक २०/८/२००९ च्या पत्राद्वारे मान्यता

दिलेली आहे. मात्र, सदरहू पदभरतीबाबत मंडळाच्या स्तरावर कार्यवाही झालेली आहे व त्याबाबतीत मे.औरंगाबाद व मुंबई उच्च न्यायालयांमध्ये अनेक याचिका दाखल करण्यात आलेल्या आहेत. तसेच, सदरहू पदांबाबत वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडे काही निर्णय झाला असल्यास, त्याबाबतची अधिकृत माहिती आस्थापना शाखेकडे नाही, असे आस्थापना शाखेतर्फे स्पष्ट करण्यात आलेले आहे.

८. **मप्रनि मंडळाच्या आस्थापनेवर २००९ पासून वर्गनिहाय रिक्त असलेली पदे याबाबतची माहिती** - आस्थापना शाखेने त्याबाबतची माहिती दिनांक ४/६/२०१२ रोजीच्या पत्रानुसार दिलेली असून, ती मिळाल्याबाबत अपिल करणार यांनी प्रांजळपणे कबुली दिली.

वरीलप्रमाणे मुददेनिहाय माहिती दिलेली असल्यामुळे, अपिल निकाली काढण्यात आले. तसेच, क्षेत्र अधिकारी, उप-प्रादेशिक अधिकारी आणि प्रादेशिक अधिकारी यांच्या बिंदुनामावलीची सरळसेवेची माहिती शासनमान्यता मिळताच, अपिल करणार यांना आस्थापना शाखेने उपलब्ध करुन द्यावी.

दिनांक २७ जून, २०१२ दिवशी मुंबई येथून,

( द. त्रि. देवळे )
प्रथम अपिलीय अधिकारी